चीबी

जपानी सत्यकथा

लेखन: बारबरा ब्रैनर व जूलिया ताकाया

चित्र: जून ओतानी

मराठी: अश्विनी बर्वे

ओका-सान (आई), एक भुऱ्या सोनेरी रंगाचे बदक, टोकियोच्या क्षितीजावर एका योग्य जागेचा शोध घेत उडत होते. आणि ती जागा इथेच होती - एक छोटेसे तळे जे चारी बाजूने वेलींनी घेरलेले होते.

ही बातमी जंगलातील आगीसारखी शहरात पसरली की मित्सुई ऑफिसच्या बागेत एका जंगली बदकाने आपले घरटे तयार केले आहे. है।

लोक दिवसभर कोणत्याही वेळी त्याच्या अंड्यातून निघालेली पिल्ले बघण्यासाठी, त्यांचे फोटो काढण्यासाठी येऊ लागले. संध्याकाळच्या बातम्यांमध्ये एक विशेष भाग “डक वॉच” साठी ठेवण्यात आला.सगळ्यात शेवटी अंड्यातून निघालेल्या पिल्लाचे नाव एका फोटोग्राफरने मिस्टर सातोने ठेवले. जपानी भाषेत चीबी या शब्दाचा अर्थ होतो छोटा, लहानगा. चीबी लोकांना सगळ्यात जास्त आवडत होता.

जेव्हा ओका-सान आपल्या खानदानाला आठ लेनचा राजमार्ग पार करून सम्राटाच्या अधिक मोठ्या बागेत घेऊन जात असे, सातो-सान त्यांना चिरडले जाण्यापासून वाचवत असे. पावसाळा सुरु झाल्यावर,वादळाच्या काळात चीबी हरवत असतांना सुद्धा मिस्टर सातो हजर असत. मिस्टर सातो यांना चीबी मिळू शकेल का? पूर्ण टोकियो शहर चिंता करत चीबीची वाट बघत आहे.

कुतुहलाने भरलेली ही एका बदकाच्या परिवाराची खरी कहाणी आहे, जे आजच्या व्यग्र राजमार्गावर येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना थांबवते. या कहाणीत टोकियोचे रोजच्या जीवनाची एक झलक सुद्धा दिसते.

चीबी

जपानी सत्यकथा



लेखन: बारबरा ब्रैनर व जूलिया ताकाया

चित्र: जून ओतानी

मराठी: अश्विनी बर्वे



केटसाठी - बी.बी.

माझी आई जी म्हणत असे,आपल्या जीवनाचा उपयोग करा- जे.टी़

माझ्या चुलत भावंडांना, रित्सुको, हिरोको आणि योशिका - जे.ओ.

अध्याय १

वसंतात एका सकाळी एक भुऱ्या - सोनेरी रंगाचे बदक टोकियोच्या क्षितिजावर उडत होते.





त्याला खूप खाली असे एक चमकणारे तळे दिसले. ते खाली वाकले आणि हळूहळू पाण्यात न फडफड करता उतरले. इकडेतिकडे बघून झाल्यावर ते तळ्याच्या जवळच्या वेलीत घुसले आणि आपले घरटे बनवू लागले.

त्याला या गोष्टीचे काहीच वाटत नव्हते की ते टोकियो शहरातल्या एका कार्यालयाच्या बागेत आहे. किंवा याच्याशी त्याला घेणे नव्हते की तो एक आठ रस्ता असणारा राजमार्ग होता. त्या राजमार्गाच्या ते एवढा जवळ आहे. या राजमार्गावर प्रत्येक मिनिटाला तीनशे गाड्या जातात. ते बदक या कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता आपल्या कामात मग्न राहिले.

काही वेळातच घरट्यात हस्तिदंताच्या रंगाचे दहा अंडी दिसू लागली. ओका-सान त्यांना लक्षपूर्वक उबवू लागली. ती मधून मधून त्या अंड्यांना उलटवत होती. म्हणजे त्यांना सगळीकडून उब मिळेल.

२६ दिवसानंतर थोडीशी हालचाल होवू लागली. एक अंडे फुटले आणि बदकाचे एक ओले पिल्लू बाहेर आले, नंतर दुसरे आणि त्यानंतर अजून सात. काही तासातच नऊ केसाळ पिल्ले आईच्या उबदार पंखाखाली चिपकून बसले.

वाटले की दहाव्या अंड्यात काहीच नसेल. पण दुसऱ्या दिवशी ते ही फुटले आणि त्यातून एका खूप छोट्या आणि अशक्त पिल्ल्याने डोके बाहेर काढले. ओका-सानने मोठ्या धैर्याने दुसऱ्या पिल्लांना बाजूला करून खानदानातील शेवटच्या आणि सगळ्यात छोट्या पिल्लासाठी जागा तयार केली.

जसे दहाव्या पिल्लाचे पंख वाळले आणि ते आपल्या पायावर चांगले उभे राहू लागले, तेव्हा आई बदकाने आपले पूर्ण खानदान तलावाच्या काठावर नेले.

तेव्हा मित्सुई ऑफिस पार्कच्या कार्यालयात काम करणाऱ्या लोकांनी बदकांना प्रथम पाहिले. हे दृश्य सनसनाटी होते. ही बातमी जंगलात पसरणाऱ्या आगे सारखी शहरात पसरली. अकरा जंगली बदके तळाच्या जवळ राहत आहेत.

आता तर लोक बदकाच्या परिवाराला बघण्यासाठी, त्यांचे फोटो काढण्यासाठी येऊ लागले. या बदकांना बघायला येणाऱ्यामध्ये आणि त्यांचा फोटो काढणाऱ्यामध्ये वर्तमानपत्राचे फोटोग्राफर मिस्टर सातो सुद्धा होते. त्यांनीच सगळ्यात छोट्या पिल्लाचे नाव *'चीबी' ठेवले. या जपानी शब्दाचा अर्थ आहे 'लहानगा'*

दिवसेंदिवस बदकांना बघणाऱ्यांची गर्दी वाढत गेली. लोक आपले खाणेपिणे बरोबर बांधून घेऊन येऊ लागले, म्हणजे त्यांना तलावाच्या जवळ बसून खाता येईल आणि त्याचबरोबर ओका-सान आणि तिच्या परिवाराचे निरीक्षण करता येईल. काही काळा नंतर खाण्यापिण्याच्या वस्तू विकणारे तिथे जमा झाले. ते आपल्या गरम नूडल्स, *ओडेन* (वाफवलेल्या भाज्या) आणि *इसोबे माकी* (तांदळाचे केक), आइसक्रीम आणि केकच्या गाड्यांसहित आले.

ट्योको टेलिव्हिजनच्या संध्याकाळच्या बातम्याचा काही भाग ‘डक वॉच’ शिर्षकाशी जोडला गेला. ज्यात बदकाच्या परिवाराची ताजी बातमी सांगितली जाई. शाळेतली मुले आपल्या वर्गा बरोबर जंगली बदकांचा परिवार बघायला येत. फोटोग्राफर फोटो काढायला येत. सातो-सान तर रोज तिथे येत.





लवकरच दररोज जवळपास चार हज़ार लोक मित्सुई ऑफिस पार्कमध्ये ओका-सान आणि त्याची पिल्ले बघण्यासाठी येऊ लागले. चीबी सगळ्यांना आवडत होती. लोकांना त्याची काळजी वाटत असे. शेवटी ते सगळ्यात छोटे होते. ते आपल्या भाऊ-बहिणीसारखे डुगडुगू चालण्याचा, एका रांगेत आईच्या मागे मागे चालण्याचा आणि पाण्यात पोटाच्या साहय्याने झपकन डुबकी मारण्याचा प्रयत्न करत होते. जेव्हा चीबीने पाण्यात डुबकी मारायचे शिकले, तेव्हा सगळेजण आनंदाने 'चीबी! चीबी!' ओरडू लागले. सातो-सानने डुबकी घेणाऱ्या चीबीचा पहिला फोटो काढला.



जूनच्या एका सकाळी ओका-सानने जोरजोरात आवाज करत आपल्या पिल्लांना एकत्र केले. जेव्हा सगळ्यांनी बदक आईच्या मागे एक रांग तयार केली, तेव्हा ती ऑफिस पार्कच्या एका दरवाज्याकडे निघाली. ती दरवाज्याच्या आधी थोडेसे थांबली, मग ती वळाली आणि डुगडुगत तळ्याच्या जवळ परत आली. तिची पिल्ले येतांना-जातांना आईच्या मागे होती.

त्या सकाळी ती सात वेळा त्या दरवाज्यापर्यंत गेली आणि परत आली.

“वे डी ओका-सान काय करत आहे? लोकांनी एक दुसऱ्यांना विचारले. सातो-सानला वाटले की त्याला समजले आहे. त्यांनी अंदाज बांधला की ऑफिसच्या बागेतले तळे बदक आणि त्याच्या परिवारासाठी छोटे पडत आहे. पण रस्त्याच्या पलीकडे वाढणाऱ्या पिल्लांसाठी पुरेशी जागा नव्हती. सम्राटाच्या बागेत असलेली मोठा ओढा होता. ओका-सान आपल्या परिवाराला तिथे घेऊन जाऊ इच्छित होती. तिचा इरादा व्यग्र रस्ता पार करण्याचा होता.



पण कधी? हे कोणालाच माहीत नव्हते. सातो-सानला सुद्धा नाही. पण त्याने पोलिसांना बातमी दिली की त्यांनी सावध राहावे, बदकांनी रस्ता ओलांडण्याच्या वेळी त्यांनी गाड्या थांबून ठेवाव्यात. दूसरे फोटोग्राफर आपल्या स्लिपिंग बॅग घेऊन तयारीने आले की रात्र त्यांना तिथेच घालवायची आहे. त्यातील काहीजण तर खूप दूरून आले होते. या आशेने की ते बदकांना आठ लेनचा रस्ता ओलांडण्याच्या वेळी ते त्यांच्या कॅमेऱ्यात पकडू शकतील.

रात्र झाली. शहरातील दिवे लागले. चंद्र सुद्धा उगवला. पण तलावावर सगळे काही शांत होते. पहाट झाली. बदकांवर नजर ठेवणारे लोक झुंजूमुंजूत काही आवाज ऐकण्याचा प्रयत्न करू लागले. पण बदकांचा परिवार झोपून राहिला.

सकाळचे अकरा वाजले होते. पण ओका-सान अजूनही पंखाच्या खाली डोके लपवून झोपून राहिली होती. चीबी आणि दुसरी पिल्ले तलावात इकडेतिकडे पाण्यातील कोळ्यांचा पाठलाग करत पोहत होते. आई बदकाने आपला विचार बदलला होता का? सातो-सानने आपली वस्तरा काढला आणि दाढ़ी केल्यावर हाततोंड धुतले. त्याने आपला ग्रीन टीचा थर्मास सगळीकडे फिरवला. पण गरम ग्रीन चहाचा आस्वाद घेतल्यावर सुद्‌धा निराशा दूर होऊ शकली नाही. काही फोटोग्राफरांनी ठरवले की ते परतील. तर दुसरे आपल्या खुर्च्या आणि स्लीपिंग बॅगवर बसले. वेळ जाण्यासाठी सातो-सानने आपल्या झोपणाऱ्या - रेलणाऱ्या मित्रांचे फोटो काढले.



ठीक बारा वाजता आई बदकाने आपली चोच वर केली, आपल्या जागेवर उठली आणि आपली शेपूट हलवली. चोच उचलणे किंवा शेपूट हलवणे हा एखादा संकेत होता का? सगळी पिल्ले आईच्या मागे एका रांगेत उभी राहिली. सगळ्यात पुढे चीबी होती, मग बाकी सगळे. पण जरा थांबा. ओका-सान आपल्या परिवाराला त्या बाजूला नेत नव्हती जिथे बघे जमले होते. ती तर उलट्या दिशेने पुढे जात होती.

सातो-सान पहिली व्यक्ती होती जिला समजले ती काय करत आहे ते. त्यांनी घाबरून पोलिसांना फोन केला. तेव्हा कॅमेरा हातात ठेवूनच त्यांनी रोपे ओलांडली आणि दुसऱ्या दरवाज्याकडे पळाले.

चौकातील सिग्नल हिरव्यातून लाल होत होता. ओका-सानने कशाही पर्वा न करता, ती सरळ पुढे बघत डुगडुगू चालत पुढे निघाली. ती फुटपाथवरून रस्त्यावर उतरली. चीबी आणि दुसऱ्या पिल्लांनी पण तेच केले. त्याच क्षणी एक स्पोर्टस् कार वेगाने चौकाकडे आली. ती सरळ बदकांच्याकडे येत होती. सातो-सानने, जे एक फोटो घेण्याच्या तयारीत होते, आपला कॅमेरा फेकला आणि रस्त्याच्या मध्ये धावले.मधोमध उभे राहून आपला हात हलवत त्यांनी चालकाला "तोमाते! तोमाते! थांबा थांबा असे म्हणू लागले.







ती कार लडखडली, त्यांनी ब्रेक दाबले! पोलिसांच्या शिट्ट्या वाजल्या. कॅमेरे चमकले. पण ओका-सानने कोणाकडेही लक्ष दिले नाही. ती आपल्या पिल्लांना चार लेनचा किसी पर ध्यान नहीं दिया. वह अपने कुनबे को चार लेन के पार डिव्हायडरवरून घेऊन गेली.नंतर खाली उतरून बाकीचा रस्ताही पार केला.



काही मिनिटांतच बदकांचा परिवार रुंद राजमार्ग पार करून दुसरीकडे सुरक्षित पोहचला होता.

आई बदक आता खाली पाण्यात उतरली. पाण्यात इकडे तिकडे पोहत ती आपल्या पिल्लांना सुद्धा उतरण्यासाठी उकसत राहिली. सगळ्या पिल्लांनी आईचे म्हणणे मान्य करत एक एक दगड लडखडत पार करत पाण्यात उडी घेतली.



आता फक्त चीबी उंच भिंतीवर डगमगत उभी होती. ती दुःखी आवाजात ओरडत होती. तिचे बहिण भाऊ ओका-सान बरोबर दूर जात होते.

सातो-सानने म्हटले, ''चीबी चल उडी मार, तू करू शकते.''

आता ओका-सान परत फिरली आणि भरोसा देणारा आवाज काढू लागली. चीबीने खाली पाण्याकडे बघितले.ते दूर खूप दूर होते. तिला भिंत फुजी पर्वतासारखी वाटत होती. तिने एक शेवटचा आवाज काढला आणि -



धप! चीबी आता आपल्या कुटुंबाबरोबर सम्राटाच्या बागेत होती.

त्या रात्री टोकियोच्या प्रत्येक वर्तमानपत्रातील पहिल्या पानावर बदकांची कहाणी छापलेली होती. सातो-सानला खंत होती की तो उचीबोरी येथील चौक पार करून बदकाचा एकही फोटो घेऊ शकला नाही. पण त्याला याचा आनंद होता की त्याने सुरक्षित सडक पार करण्यात त्यांना मदत केली होती.

अध्याय 2

दुसऱ्या वेळी जेव्हा सातो-सान बदकांना बघायला गेला तेव्हा त्याने बघितले की चीबी आणि त्याचे भाऊ-बहिण, म्हणजे वाढत्या वयाच्या पिल्लांसाठी ही जागा एकदम योग्य होती. खाण्यासाठी मोठ्या तलावात, ओढ्यात भरपूर अन्न होते आणि उडण्याचा अभ्यास करण्यासाठी खूप जागा होती.



पण बदकांचा परिवार तिथे एकटा नव्हता. सोनेरी रुपेरी मासेही पाण्यात सरसर पोहत होते. चौकोनी डोक्याचे कासवं अन्नाच्या शोधात ओढ्यापर्यंत येत असत आणि पाण्यातील साप दगडांवर ऊन खात पडून राहत. ओढ्यात हंस सुद्धा होते. बदकांच्या लक्षात आले की ओढ्यात कमी मित्र असणारे तेच एकमेव जीव होते.



हंस अचानक पांढऱ्या पाण्याच्या जहाजांसारखे येतांना दिसत. जेव्हा बदक समोर दिसत तेव्हा ते रागाने ओरडत किंवा भीतीदायक आवाज काढत. चीबीला त्यांच्या रस्त्यातून बाजूला होण्यात फार त्रास होत असे. ती जशी त्यांना बघे, तेव्हा ती जेवढ्या वेगात होईल तेवढ्या वेगाने बाजूला पळून जाण्याचा प्रयत्न करत असे. त्यामुळे त्याच्या फडफड करणाऱ्या चोची पासून वाचू शके.



लोक इथेही बदकाच्या कुटुंबाला भेटण्यासाठी आणि त्यांचे फोटो काढण्यासाठी येत राहिले. खाडीच्या आसपास नेहमी गर्दी असे. बागेत पळणारे काही वेळ थांबून त्यांना बघत. चीबीला सगळेजण ओळखत होते. जेव्हा हंस खूप जवळ येत तेव्हा लोकांना चिंता वाटे. सातो-सान त्यांना भेटण्यासाठी दररोज येत. चीबीला ते खास पद्धतीने नमस्कार घालत, म्हणत *‘कोन्नीची-वा’* (शुभ दिवस) ते हे जोरात म्हणते, त्यांचा आवाज खडकांवर पडून गुंजत असे.

जूनमध्ये टोक्योमध्ये पाऊस सुरु झाला, रोज थोडा थोडा पाऊस पडत असे. रस्त्या पाण्यामुळे चमकू लागला होता. पण सातो-सान आणि इतर बघणारे लोक अजूनही बदकांना बघायला येत राहिले. ते आपली छत्रीच्या खाली जमा झालेल्या पाण्यात उभे राहून चीबी आणि तिच्या बहिण भावांना पाऊसाच्या थैंबाशी खेळतांना बघत.





पण तेव्हा हवामान बदलले. पाऊस जोरात आणि सतत पडू लागला. रोज वारे वादळ होऊ लागले. जोरात वाहणाऱ्या वाऱ्यात पाऊस पडू लागला. हवेमुळे चेरीच्या झाडाच्या फांद्या तुटू लागल्या झाडाची पाने तुटून धरतीवर पसरली. खाडीत धुवाधार पाऊस पडत होता. पाणी, समुद्रासारख्या पांढऱ्या लाट्यामध्ये बदलून धडका मारू लागले.

आता कमी लोक आपल्या घरातून बाहेर येण्याची हिंमत करत होते. राजमार्ग आता सुनसान झाला, कधीतरी त्या रस्तावरून गाडी जातांना दिसे. सातो-सान, यांना चीबी आणि दुसऱ्या बदकांची काळजी वाटत होती. त्यांनी कसेतरी करून तलावाजवळ पोहचण्याचा प्रयत्न केला. पण हवेच्या तीव्र झोतामुळे ते गुडघ्यावर पडले त्यामुळे त्यांना घरी यावे लागले.



तलावात पाण्याच्या लाटा उठू लागल्या. पाण्याचे झरे रस्त्याने वाहू लागले. झाडे, मुळे, प्लास्टिकचे तुकडे, एवढेच नाही तर सोनेरी कार्प मासे सुद्धा वरती आले. पूर येत होता. हंस पाण्यातून उडून उंच जागी जाऊन बसले होते. जिथे ते एक-दुसऱ्याना चिटकून पंखात डोके घालून बसले होते. साप खडकांच्या कपारीत दबून बसले होते. कासवे तळात खराब पाण्यात आपल्या बिळात सुरक्षित होते.

पण बदके जाणार तरी कुठे? हा प्रश्न अनेक लोकांच्या मनात होता. सातो-सान आपल्या घरात बसून बदकांची खास करून चीबीची चिंता करत होते.

वादळ दिवसेंदिवस चालले. जेव्हा पाऊस थांबला, आकाश स्वच्छ झाले. मग लोक घरातून बाहेर आले. बदक बघणारे पटपट सम्राट बागेत बदकाची हालहवाल बघायला आले. पण त्यांचे कुठेही नामो निशाण नव्हते. सातो-सानने तलावाला पूर्ण चक्कर मारला. पार शेवटी त्यांना आई बदक दिसली. पण तिच्या बरोबर फक्त सातच पिल्ले होती. तीन पिल्ले गायब होते, त्यातील एक चीबी सुद्धा होती.



सातो-सानने लगेच एक शोधक पथकर तयार केले. लोक ओढ्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत हरवलेल्या पिल्लांना शोधू लागले. त्यांनी त्यांच्या पायाचे निशाण,पंख, हाडे, आणि इतर सुराग मिळतो का बघितले. सम्राटाच्या बागेची रखवाली करणारे माळी सुद्धा शोधकार्यात सामील झाले. या काळात ओका-सान अस्वस्थ होऊन ओरडत-किंचाळत पाण्यात मागेपुढे पोहत आपल्या मुलांचा शोध घेत होती. ती हवेत उडाली, ओढ्याच्या किनाऱ्यावर, दगडांच्या फटीत शोधले. एवढेच नाही तर ती मोठा रस्ता पार करत मित्सुकी ऑफिसच्या बागेत सुद्धा गेली. तिने तिथे आपल्या जुन्या घरट्यात जाऊन बघितले. पण चीबी आणी बाकीची दोन पिल्ले नव्हती.

दोन दिवसांनतर एक पिल्लू मेलेले आढळले. ते पुरात बुडून मेले होते. जेव्हा ही बातमी कळली तेव्हा शेकडो लोक ताजे फुल घेऊन आले. पाण्याजवळ त्यांनी बुडालेल्या पिल्लांचे स्मारक केले. सातो-सानने त्यांचे फोटो काढले. जर चीबीचा मोठा आणि ताकदवान भाऊ वादळात सापडला होता, तेव्हा चीबी वाचण्याची शक्यता कशी असणार होती?



दुसऱ्या दिवशी दुसरे पिल्लूहि अचानक परतले. कोणालाच माहीत नव्हते ते कुठे होते आणि परत घरी कसे आले. पण ते वादळाच्या झटक्यातहि ठीक होते. पण चीबी कुठे होती?

तेव्हाच काहीतरी अद्भुत घडले. सातो-सानला खाडीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर जोरदार आवाज ऐकू आला. ते तिकडे पळाले. ओका-साननने पण ऐकले ती त्वरित त्या दिशेला उडाली.



पण दोघे तिथे पोहचण्याच्या आधीच एक लहानशी आकृती पोहतांना त्यांना दिसली. ती चीबी होती. ती एका लाटांवर प्रवास करणाऱ्या एका तुकड्यावर उभी होती. हे साहसी छोटे बदक कसेतरी आपल्या कामचलाऊ आधाराने वादळाशी सामना करू शकली होती. प्लास्टिकच्या त्या तुकड्याने तिचे प्राण वाचवले होते.

क्लिक! सातो-सानच्या कॅमेऱ्याने आनंदाने तो क्षण कैद केला.





चीबीची परत येण्याची कहाणी सातो-सानच्या फोटोसहित टोकियोच्या सर्व वर्तमानपत्रात छापली. जेव्हा सम्राटाने साहसाने वादळाशी लढणाऱ्या बदकांच्या परिवाराची गोष्ट ऐकली, त्यांनी हुकुम दिला की त्यांच्यासाठी एक मजबूत आणि सुंदर बदक घर तयार करा.



ते आजही सम्राट बागेतील खाडीत उभे आहे. प्रत्येक वर्षी चीबी आणि तिचे भाऊ-बहीण तिथे घरटे तयार करायला आणि आपल्या पिल्लांचे पालनपोषण करण्यात तिथे येतात. जर तुम्ही तिथे गेलात तर एक बुज़ुर्ग जपानी वृद्ध पुरुष फोटो काढतांना दिसेल.



कहानी के पीछे

चीबी एका खऱ्या गोष्टीवर आधारित आहे. जूलिया ताकाया, अमेरिकी शिक्षिका-लेखिकेचे एका जपानी व्यवसायिकाबरोबर लग्न झाले होते. ते टोकियोतील त्या हजारो निर्वासितामधले एक होते. जी त्या साहसी बदक आईच्या कहाणीची साक्षीदार होती. जी शहरात मधोमध आपल्या खानदानाला सांभाळत होती. सर्व फोटोग्राफर, बातमीदार आणि शहरातील निवासी यांच्यासारखेच जूलिया ताकाया पण या बदकाकडे आकर्षित झाली होती.

जेव्हा ते नंतर अमेरिकेत परत गेले तेव्हा त्यांनी ही गोष्ट बरोबर आणली होती. जूलिया आणि लेखिका बार्बरा ब्रैनर यावर सहमत होत्या की चीबी आणि फोटो काढणारे बुज़ुर्ग मिस्टर सातो, सम्राट बागेतील खाडी आणि त्यात आलेल्या पुराची कहाणी कालातीत आहे, आणि मुलांना नेहमी आवडणारी खरी कहाणी आहे.





काही गोष्टी ज्या तुम्हांला माहीत करून घ्यायला आवडेल.

या कहाणीतील बदक आनस पोएसिलरिंका प्रजातीतील आहे, जिचे इंग्रजी नाव स्पॉटबिल डक आहे.

टोकियोतील मित्सुई कंपनीने आपल्या ऑफिसच्या बागेतील तळ्यात दरवर्षी परत येणाऱ्या बदकासाठी त्यांच्या परिवारासाठी एक बदक घर तयार केले आहे.



बार्बरा ब्रैनर

लहान मुलांच्या गोष्टी व निसर्गावर पुस्तके लिहित असे. त्या बैंक स्ट्रीट कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या सक्रिय सदस्य आहेत. त्या आपले कलाकार पती फ्रैड ब्रैनर बरोबर हॉली, पेन्सिलवेनियामध्ये राहत आहेत.

जूलिया ताकाया

एक शिक्षिका व लेखिका आहे. ती त्यावेळी योगायोगाने ऑफिस पार्क मध्ये होती.जेव्हा जंगली बदकांचा परिवार प्रथम दिसला होता. मिस्टर सातो सारखीच ती सुद्धा या बहादूर आई बदकाची चाहती झाली. जी शहराच्या गोधळात आपल्या पिल्लांना सांभाळण्याचा प्रयत्न करत होती. जूलिया आपल्या पती बरोबर वर्षातील अधिकतर काळ जपान मध्ये व्यतीत करते.

जून ओतानी

च्या रचना अनेक प्रदर्शनात प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांनी मुलाच्या अनेक पुस्तकांची चित्रे काढली आहेत. त्या आपल्या पती बरोबर न्यू यॉर्कच्या हेस्टिंगस्-ऑन-हडसनमध्ये राहतात.

चीबी: जापानी सत्यकथा

लेखन: बारबरा ब्रैनर व जूलिया ताकाया
चित्र: जून ओतानी
भाषन्तर: पूर्वा याज्ञिक कुशवाहा